**विद्यापीठातील टी. सी.एस. कॅंपस इंटरव्यूमध्ये १४ विद्यार्थ्यांची निवड.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. तसेच बी. बी. ए. च्या विद्यार्थ्यांसाठी टी.सी.एस. कंपनीचे कॅंपस इंटरव्यू आयोजित करण्यात आले होते. विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना हि संधी उपलब्ध करून देण्यात आली होती. महाविद्यालयात शिकणारे सुमारे ३०० (तीनशे) विद्यार्थी या कॅंपस मुलाखतींसाठी उपस्थित होते. सदरील कॅंपस इंटरव्यूचे उद्घाटन मा. कुलगुरू डॉ. बी.ए. चोपडे यांनी करून विद्यार्थ्यांनी आपले शैक्षणिक कौशल्य व्यावहारिक जगात कसे वापरावे व स्व-विकासासाठी त्याचा खुबीने कसा वापर करावा याचे मार्गदर्शन उपस्थित विद्यार्थ्यांना केले.

उपस्थित ३०० विद्यार्थ्याना चार प्रकारच्या टेस्ट पार करावयाच्या होत्या. त्यात अॅप्ट ट्युड टेस्ट, पर्सनल इंटरव्यू , ग्रुप डिस्कशन, आणि सगळ्यात शेवटी टेलिफोनिक इंटरव्यू अशा प्रकारच्या चाचण्या ठेवण्यात आल्या होत्या. ३०० विद्यार्थ्यांपैकी ६१ विद्यार्थी टेस्ट पार करू शकले. व इतर चाचण्या पार करून शेवटी १४ विद्यार्थ्यांना यश मिळाले. टी. सी.एस. चे श्री. गीरीकुमार यांनी फीड बॅक देतांना श्री. गिरीश काळे यांना सांगितले कि इथल्या विद्यार्थ्यांमध्ये टॅलेंट भरपूर आहे. फक्त कम्युनिकेशन आणि तेही इंग्लिश मध्ये कम्युनिकेशन हा सगळ्यात मोठा विक पॉइंट आहे. विद्यार्थ्यांसाठी विविध सेमिनार, वक्तृत्व स्पर्धा, इंटरव्यू ला कसे सामोरे जायचे याचे जास्तीत जास्त ट्रेनिंग महाविद्यालयीन स्तरावर देणे आवश्यक आहे. इथल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकता, सातत्य, नाविन्यता आहे. फक्त संभाषण कौशल्यात कमी पडल्यामुळे संधी हिरावली जात आहे.

तसेच येत्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी विविध कार्यक्रम विद्यापीठातर्फे घेण्यात येणार असल्याचे प्लेसमेंट ऑफिसर श्री. गिरीश काळे यांनी सांगीतले. व श्री. एस. आर वराडे यांनी आभार प्रदर्शन केले.

या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. बी.ए. चोपडे, तसेच प्लेसमेंट अधिकारी श्री. गिरीश काळे, रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाचे श्री. वि.का. भुसारे, अधिकारी श्री. एस. आर. वराडे तसेच टी. सी. एस. कंपनीच्या मिस. श्रुती हेगडे, मिस. ज्योती शेट्टी, श्री. गीरीप्रसाद हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री. राजदत्त ठाले, श्री. हमीद खान यांनी मेहेनत घेतली.